## अध्याय 2

## विभागाची माहिती व कार्ये

मुंबईच्या एकूण लोकसंख्येच्या 75 टक्के लोकसंख्या उपनगरात वास्तव्य करते.  जवळजवळ 95 लाख लोकसंख्येच्या आरोग्याची व उपचारांची जबाबदारी 16 उपनगरीय रुग्णालयाद्वारे घेतली जाते.  या उपनगरीय रुग्णालयांचे व्यवस्थापन प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या मार्फत नियंत्रित् केले जाते.  उपनगरातून जाणारे महामार्ग, रेल्वेमार्ग, सागरी किनारे, मोने रेल, मेट्रोरेल, उपनगरातील झोपडपटया, उपनगरात सतत वाढणारी लोकसंख्या यांना योजनापूर्वक आरोग्य सेवा पूविण्याचे कार्य ही रुग्णालये करतात.

सन 1914 पासून टप्प्या-टप्प्याने ही उपनगरीय रुग्णालये कार्यरत झाली. आजमितीस एकूण 4589 इतक्या रुग्णाशय्येद्वारे उपनगरीतील वाढत्या लोकसंख्येस आरोग्य सेवा पूरविली जाते.

प्रमुख् वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) (प्रभारी) डॉ. प्रदिप आ. जाधव, यांच्या देखरेखीखाली उपनगरातील लोकांना पुढे नमूद केलेल्या 16 उपनगरीय रुगणालीयांतील माध्यमिक आरोग्य सेवाविभाग कार्यरत आहे.

1. के. बी. भाभा रुगणालय वांद्रे
2. वि. नं. देसाई रुग्णालय, सांताकृझ
3. सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव
4. स. का. पाटील रुगणालय मालाड (पू)
5. म. वा. देसाई रुग्णालय, मालाड (प)
6. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदीवली
7. सावित्रीबाई फुले रुग्णालय, बोरीवली (पू)
8. श्री. हरिलाल भगवती रुग्णालय, बोरीवली (प)
9. के. बी. भाभा रुग्णालय, कुर्ला
10. श्रीमती दिवालीबेन मोहनलाल मेहता मॉ. रुग्णालय चेंबूर
11. पंडित मदनमोहन मालविया शताब्दी रुगणालय चेंबूर
12. सेठ व्ही.सी. गांधी व सेठ एम.ए. व्होरा रुग्णालय राजावाडी, घाटकोपर (पू)
13. संत मुक्ताबाई रुग्णालय घाटकोपर (प)
14. क्रांतीवीर महात्मा ज्योतीबा फुले रुग्णालय ,विक्रोळी
15. स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर रुग्णालय मुलुड (पू)
16. मनसादेवी तुलसीदास अगरवाल रुग्णालय, मुलुंड (प)

तसेच सार्वजनिक - खाजगी सहभागातून पुढील प्रकल्प कार्यरत आहेत.

सेव्हन हिल्स रुगणालय, मरोळ - मुंबई महानगरपलिकेसाठी 65 खाटा आरक्षित - सदर रुग्णालयावर देखरेख ठेवण्यासाठी महापालिकेचे विशेष कार्य अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे.

प्रत्येक उपनगरीय रुग्णालयाच्या क्षमतेनुसार पुढील रुग्णसेवा-सुविधा उपलब्ध आहेत. प्रत्येक उपनगरीय रुग्णालयात उपलब्ध असलेल्या रुग्णसेवा-सुविधांची माहिती त्या -त्या रुग्णलयाच्या वेबसाइटवर देण्यात आलेली आहे.

- आंतर-रुग्ण सेवेसहित चोवीस तास अपघात विभाग
- वैदयकीय विभाग
- वैदयकीय अतिदक्षता विभाग
- शल्यक्रिया विभाग
- शल्यक्रिया अतिदक्षता विभाग
- स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र
- अस्थिव्यंग विभाग
- बालरुग्ण विभाग
- बालरुग्ण अतिदक्षता विभाग
- नवजात अतिदक्षता विभाग
- शिशु अतिदक्षता विभाग
- कान-नाक-घसा विभाग
- नेत्ररोग चिकित्सा
- मानसोपचार विभाग
- भाजलेल्या रुग्णांचा कक्ष
- दंत चिकित्सा विभाग
- त्वचारोग व कुष्ठरोग
- विशेष क्षयरोग विभाग
- शालेय चिकित्सालय
- श्वानदंश उपचार
- शक्ती क्लीनीक
- आयुष विभाग
- लसीकरण विभाग
- एम.आर.आय.
- सी.टी.स्कॅन
- सोनोग्राफी
- क्ष-किरण
- प्रयोगशाळा व रक्तपेढी
- भौतिकोपचार विभाग
- रुग्णवाहिनी
- शववाहिनी
- शवागार
- वृध्दोपचार चिकित्सा विभाग
- केमोथेरेपी उपचार
- डायलिसीस केंद्र
- डॉट प्लस सुविधा
- सशुल्क रुगणशय्या (मध्यम वर्गीयांसाठी)
- जननी सुरक्षा योजना
- कुटुंब कल्याण केंद्र
- दिलासा केंद्र